महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक एसएफएस-२०१६/प्र.क्र.६९/एसएम-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: १७ जून, २०१६

वाचा :-

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र-२००९ /(६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२

२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अनाशा/ स्वयंअर्थ/२०१५-१६/माध्य-क(३०१)/२९८१, दिनांक ५ मे, २०१६

प्रस्तावना :-

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छूक असणा-या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता नवीन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरिता दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करुन पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता प्राप्त झालेल्या एकूण ५३०१ प्रस्तावांपैकी

प्राचार्य
विद्या प्रतिष्ठानचे
सुपे इंग्लिश मिडियम स्कूल
सुपे, ता.बारामती (पुणे) ४१२२०४
यु.डायस नं.२७२५०२००६०५
TRUE COPY
Scanned with OKEN Scanner

[illegible] विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या ४०७३
४०७३ शाळांचे प्रस्ताव पात्र ठरतात. त्यानुसार या सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या ४०७३ शाळांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून नवीन शाळा स्थापन करणे आणि विद्यमान शाळांना दर्जावाढ करणे याकरीता याद्वारे शासन परवानगी देण्यात येत आहे.

२. शासन परवानगी/शाळांचा दर्जावाढ करण्याच्या अटी व शर्ती -

२.१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२.२ पात्र ठरलेल्या संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

ब) ज्या व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

क) सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तींची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

२.३ सोबतच्या विवरणपत्रातील यादीनुसार परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळांना i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील

२.४ सदर आदेश संबधित संस्थांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

२.५ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची

प्राचार्य
विद्या प्रतिष्ठानचे
सुपे इंग्लिश मिडियम स्कूल
सुपे,ता.बारामती (पुणे) ४१२२०४
यु.डायस नं.२७२५०२००६०५

TRUE COPY



Scanned with OKEN Scanner

स्थानी करावी व त्यानंतर प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

२.७ **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, "*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१६०६१७१७१८५०९४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

(रा. ग. गुंजाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
५. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
७. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
८. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
९. शिक्षण निरीक्षक(पश्चिम/उत्तर/दक्षिण) बृहन्मुंबई
१०. सर्व संबधित प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपालिका
११. निवडनस्ती (एसएम-२).

TRUE COPY

प्राचार्य
विद्या प्रतिष्ठानचे
सुपे इंग्लिश मिडियम स्कूल
सुपे, ता.बारामती (पुणे) ४१२२०४
यु.डायस नं.२७२५०२००६०५

Scanned with OKEN Scanner

Supp

Date: Tuesday [illegible] 2016 10:48 AM

From: Namdeo More [mailto:more@viitindia.org]
Sent: Tuesday, June 21, 2016 10:31 AM
To: Amol Goje
Cc: Sunjjoy Jagtap
Subject: GR copy

Respected Sir,

[illegible] school is permission.

1) Supe English Medium School-Supe ( Std. [illegible] 5th ) [illegible]

2) English Medium School Indapur ( 11th & 12th Commerce & Sci. (Page No 85 Sr.No 1207.)

| | |
|---|---|
| SECRETARY | [signature] |
| REGISTRAR | [signature] 2/6/16 |
| OFFICE SUPDT. | |

Mr. Anil + welfare

More

Info Schools
Anil

Attachments

- New School GR_2016-2017_20160617171850942l.pdf (3.46 MB)

TRUE COPY

प्राचार्य
विद्या प्रतिष्ठानचे
सुपे इंग्लिश मिडियम स्कूल
सुपे,ता.बारामती (पुणे) ४१२२०४
यु.डायस नं.२७२५०२००६०५

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

| अ.क्र | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | शाळेचे नाव व पत्ता | नवीन शाळा/ दर्जावाढ | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | शाळेचे माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| ८८८ | पुणे | कर्मवीर शिक्षण प्रसारक मंडळम्, पो. रायमोह, ता. शिरुर कासार, जि. बीड पिन - ४१४२०५ | रायझिंग इरा इंग्लिश मेडियम स्कूल सर्वे.न २५/७/२ ,पुनावाला बिल्डिंग ,प्रभात पेठ समोर ,मु/पो नर्हेगाव , तालुका : हवेली ,जिल्हा : पुणे ४११०४१ | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक (इयत्ता १ ली.ते ५ वी.) | इंग्रजी |
| ८८९ | पुणे | कार्ला एज्युकेशन ट्रस्ट श्री.आनंदाश्रम ,प्लॉट ४७७ , १८ वा रोड , खार ( पश्चिम ), मुंबई ४०००५२ | पद्मिनानाश्रम विद्यालय प्लॉट नं ५३३ ,दुर्गा परमेश्वरी प्रॉमिसेस , कार्ला ,कार्ला फाटा ,जुना मुंबई - पुणे हायवे तालुका मावळ , जिल्हा : पुणे ४१०४०५ | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक (इयत्ता १ ली.ते ५ वी.) | इंग्रजी |
| ८९० | पुणे | विद्या प्रतिष्ठानविद्यानगरी, भिगवण रोड, तालुका बारामती, जिल्हा पुणे - ४१३-१३३ | विद्या प्रतिष्ठानचे सुपे इंग्लिश मीडियम स्कूलसुपे तालुका बारामती जिल्हा-पुणे- ४१२ २०४ | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक (इयत्ता १ ली.ते ५ वी.) | इंग्रजी |
| ८९१ | पुणे | पुणे जिल्हा शिक्षण मंडळ पुणे,४८/१ अ एरंडवणा,पौड रोड पुणे ४११०३८ | पी डी ई ए इंग्लिश मेडिअम प्रायमरी स्कूल वाघोलीम्, पो.- वाघोली, तालुका-हवेली, जिल्हा-पुणे पिन-४१२२०७ | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक (इयत्ता १ ली.ते ५ वी.) | इंग्रजी |
| ८९२ | पुणे | पुणे जिल्हा शिक्षण मंडळ पुणे,४८/१ अ एरंडवणा,पौड रोड पुणे ४११०३८ | पी डी ई ए इंग्लिश मेडिअम प्रायमरी स्कूल पिरंगुटम्, पो.- पिरंगुट, तालुका-मुळशी, जिल्हा-पुणे पिन-४१२११५ | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक (इयत्ता १ ली.ते ५ वी.) | इंग्रजी |
| ८९३ | पुणे | पुणे जिल्हा शिक्षण मंडळ पुणे,४८/१ अ एरंडवणा,पौड रोड पुणे ४११०३८ | पी डी ई ए इंग्लिश मेडिअम प्रायमरी स्कूल पौडम्, पो.- पौड, तालुका-मुळशी, जिल्हा-पुणे पिन- ४१२१०८ | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक (इयत्ता १ ली.ते ५ वी.) | इंग्रजी |
| ८९४ | पुणे | रयत शिक्षण संस्थेचे के के घुले विद्यालय मांजरी बुकर्मवीरनगर मांजरी बु ता.हवेली जि.पुणे पिनकोड- ४१२३०७ | के के घुले विद्यालय व प्राथमिक इंग्लिश मेडीअम स्कूलकर्मवीरनगर मांजरी बुद्रुक तालुका हवेली जिल्हा पुणे ४१२ ३०७ | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक (इयत्ता १ ली.ते ५ वी.) | इंग्रजी |
| ८९५ | पुणे | सिद्धबेट ग्रामविकास प्रतिष्ठान मु.पो.- केळगाव , ता- खेड , जि.- पुणे . | ज्ञानदा इंग्लिश मेडियम स्कूलम्,पो.- केळगाव , ता- खेड , जि.- पुणे | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक (इयत्ता १ ली.ते ५ वी.) | इंग्रजी |
| ८९६ | पुणे | कासेगाव एज्युकेशन सोसायटी कासेगावद्वारा राजारामबापू इंजिनीरिंग कॉलेज राजारामनगर साखराळे तालुका वाळवा जिल्हा सांगली ४१५४१४ | विद्यानिकेतन इंग्लिश मेडियम स्कूल कुसेगावकुसेगाव तालुका मावळ जिल्हा पुणे ४१०३०२ | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक (इयत्ता १ ली.ते ५ वी.) | इंग्रजी |
| ८९७ | पुणे | श्री नरसिंह एज्युकेशन सोसायटी बिल्डिंग न . १५ , इंद्रायणी , फ्लॅट न . ३०५ , एम सहकारी सोसायटी,आर टी ओ ऑफिस मागे , येरवडा , पुणे - ४११००६ | इब्ब्स इंटरनॅशनल प्रायमरी स्कूलगट न . ८८८ , वाघोली - शिक्रापूर रोड , मार्केट यार्ड समोर , तळेगाव रोड , कारेगाव , तालुका : शिरूर , जिल्हा : पुणे ४१२२०८ | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक (इयत्ता १ ली.ते ५ वी.) | इंग्रजी |
| ८९८ | पुणे | आर एस एन फाउंडेशनबजरंग विल्ला गंगा रस्ता , नो - १ /०२३८,वाघोली, तालुका हवेली, पुणे | ऑक्सफोर्ड वर्ल्ड स्कूल बजरंग विल्ला, गंगा रस्ता , सर्वे.न - १/०२३७, वाघोली, तालुका हवेली, पुणे | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक (इयत्ता १ ली.ते ५ वी.) | इंग्रजी |
| ८९९ | पुणे | श्री गाडगे महाराज मिशन मुंबई विद्यार्थी भुवन, त्रिभुवन रोड, मुंबई ४००००४ | क्रिसेंटस वर्ल्ड स्कूल ओतूर मु/पो. ओतूर तालुका जुन्नर जिल्हा पुणे पिन ४१२४०९ | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक (इयत्ता १ ली.ते ५ वी.) | इंग्रजी |
| ९०० | पुणे | विशाल जुन्नर सेवा मंडळ मुंबईबी ३ ससेक्स इण्डस्ट्रियल इस्टेट दादोजी कोंडदेव क्रॉस मार्ग भायखळा मुंबई ४०००२७ | व्ही जे इंटरनॅशनल स्कूलकांदळी तालुका जुन्नर जिल्हा पुणे ४१२४१२. | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक (इयत्ता १ ली.ते ५ वी.) | इंग्रजी |
| ९०१ | पुणे | विभूती शिक्षण प्रसारक मंडळम्, पो. लोणीकंद, रामनगर, तालुका - हवेली , जि. पुणे ४१२२१६ | द हेरिटेज पब्लिक स्कूलम्,पो. लोणीकंद ,रामनगर ता.हवेली , जि पुणे | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक (इयत्ता १ ली.ते ५ वी.) | इंग्रजी |
| ९०२ | पुणे | विद्यार्थी विचार प्रतिष्ठान आरंभ निवास , गट नं ८७४ मु/पो शिवाली तालुका,हवेली, जिल्हा पुणे ४११०६२ | केके-इंटरनॅशनल स्कूल गट नं २७१ स्टेट रोड , केडगाव ,तालुका : दौंड , जिल्हा : पुणे पिन : ४१२८०१ | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक (इयत्ता १ ली.ते ५ वी.) | इंग्रजी |
| ९०३ | पुणे | समृद्धी एज्युकेशन सोसायटी १/१/अ ,मिलारे वाडी , साई प्रसाद बंगला , वारजे पुणे | प्यरामाउंट इंटरनॅशनल स्कूल१४/१ , मिलारेवाडी वारजे पुणे ५८ | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक (इयत्ता १ ली.ते ५ वी.) | इंग्रजी |
| ९०४ | पुणे | आई एज्युकेशन सोसायटी पी -१३ , फ्लॅट नं -१५ , गंधर्व नगरी मोशी पुणे ४१२१०५ | न्यू ऑक्सफोर्ड इंटरनॅशनल स्कूल मु/पो .मंचर ता.आंबेगाव जि. पुणे ४१०५०३ | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक (इयत्ता १ ली.ते ५ वी.) | इंग्रजी |
| ९०५ | पुणे | श्री पांडुरंग आण्णासो काळे ट्रस्टमु. काळेवाडी, पोस्ट- पऱ्हाडी बु. तालुका- हवेली, जिल्हा- पुणे पिन ४१२१०५ | ज्ञानकुल स्कूल मु.पोस्ट- काळे कॉलनी, स.नं. १५५/१ (पोदिसावाडी) काळेवाडी, पऱ्हाडी बु.(आळंदी नगरपालिका हद्द ), तालुका- हवेली, जिल्हा- पुणे, पिन ४१२१०५ | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक (इयत्ता १ ली.ते ५ वी.) | मराठी |

TRUE COPY

प्राचार्य
विद्या प्रतिष्ठानचे
सुपे इंग्लिश मिडियम स्कूल
सुपे,ता.बारामती (पुणे) ४१२२०४
न.डायस ने.२७२५०२००६०५

TRUE COPY

PRINCIPAL
Vidya Pratishthan's
Supe English Medium School
Supe,Tal-Baramati (Pune) 412204



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

२११४७ मा. ७

Vidya Pratishthan
Vidyanagari, Baramati
Inward No. ...
Date ...

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
दूरध्वनी क्र:-
Email ID:- sm2.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२१/प्र.क्र.०७/एसएम-२ दिनांक:- ०१ जून, २०२१

1.2

## मान्यता पत्र

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
विद्या प्रतिष्ठाण,
विद्यानगरी, भिगवण रोड,
बारामती, ता. बारामती, जि. पुणे-४१३ १३३

विषय - महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरु करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र ...

विद्या प्रतिष्ठाण, बारामती, जि. पुणे संचलित सुपे इंग्लिश मिडिअम स्कुल, सुपे, ता. बारामती, जि. पुणे.

संदर्भ - इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२१/प्र.क्र.०७/एसएम-२, दिनांक ०४.०२.२०२१.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत विद्या प्रतिष्ठाण, बारामती, जि. पुणे या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुपे इंग्लिश मिडिअम स्कुल, सुपे, ता. बारामती, जि. पुणे या शाळेचा (प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. ६ वी ते इ. १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ) स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ करण्याकरीता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून विद्या प्रतिष्ठाण, बारामती, जि. पुणे संचलित सुपे इंग्लिश मिडिअम स्कुल, सुपे, ता. बारामती, जि. पुणे या शाळेचा (प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. ६ वी ते इ. १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ) स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ करण्याकरीता, अटीं व शर्तींसह इरादा पत्र दिले होते. आता सदर दर्जावाढ करण्याची मान्यता, पुढील अटीं व शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे:-

TRUE COPY

प्राचार्य
विद्या प्रतिष्ठानचे
सुपे इंग्लिश मिडियम स्कूल
सुपे, ता.बारामती (पुणे) ४१२२०४

Scanned with OKEN Scanner

३. अटी व शर्ती :-

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तींची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तींची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तींचे आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबधीत, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

प्राचार्य
विद्या प्रतिष्ठानचे
सुपे इंग्लिश मिडियम स्कूल
सुपे,ता.बारामती (पुणे) ४१२२०४
यु.डायस नं.२७२५०२००६०५

TRUE COPY

Scanned with OKEN Scanner

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणांवरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

१३) सदर संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने अधिनियमाच्या "अनुसूची ग" मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम, व्यवस्थापन आणि संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या नावे संयुक्तरित्या, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राच्या स्वरुपात किंवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेतील मुदत ठेवीच्या स्वरुपात ठेवणे आवश्यक राहील.

(ज्ञ. मु. काझी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी -

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.
७. निवड नस्ती ( ०७/२१/एसएम २).

| | |
|---|---|
| SECRETARY | |
| REGISTRAR | |
| OFFICE SUPDT. | |

प्राचार्य
विद्या प्रतिष्ठानचे
सुपे इंग्लिश मिडियम स्कूल
सुपे, ता. बारामती (पुणे) ४१२२०४
यु.डायस नं.२७२५०२००६०५

TRUE COPY

Vidya Pratishthan's Supe English Medium School Supe Baramati 412204

Scanned with OKEN Scanner